# संवाद

# ICEEM

Expanding Horizon
ICEEM
Research to reality...



An Annual Magazine of Institute

2024-2025

ICEEM Expanding Horizon

Research to reality...

SANWWAAD

# INDEX


| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| 1 | Patrons | |
| 2 | Chif Editor – डॉ गौतम सहा | |
| 3 | विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याची पायाभरणी – मा. चेअरमन, डॉ.सुभाष झवर | |
| 4 | ज्ञान आणि कौशल्ये हेच तुमचे सामर्थ्य – मा. व्हा.चेअरमन, दिलीप सारडा | |
| 5 | आयसीमच्या विद्यार्थ्यांना नोकरी देणारे बनवा – मा. सचिव, डॉ सचिन झवर | |
| 6 | स्वप्नांना पंख देणारे मंदिर – मा. संचालक डॉ. कल्पना झवर | |
| 7 | कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी आणि आव्हाने – मा. डायरेक्टर डॉ.आर.आर.देशमुख विद्यार्थी | |
| 8 | 'जॉब रेडी' (Job Ready) झाला पाहिजे – कॅम्पस डायरेक्टर डॉ.सी.एस.पद्मावत | |
| 9 | संक्षिप्त आढावा... – उप प्राचार्य प्रा.हेमंत जाधव | |
| 10 | लोकशाही बळकट करण्यात अभियांत्रिकीचे योगदान – अडमिशन डीन प्रा.आनंद हुंबे | |
| 11 | पॉलिटेक्निकचे महत्त्व आणि आमच्या संस्थेचा दृष्टिकोन – पॉलिटेक्निक प्राचार्य प्रा. नितीन मगर | |
| 12 | स्त्री : 'ऑपरेशन सिंदूर' पासून सीमांवरच्या रणांगणापर्यंत – डॉ. दीपमाला बिरादार | |
| 13 | पिंजयाः च्या वाटचालीचा घातक ट्रेंड – प्रा. मंगल काळे | |
| 14 | Fueling the Future of Progress – Dr Goutam G. Saha | |
| 15 | 'आदर्श उद्योजक' पुरस्काराचा गौरवशाली प्रवास – अच्युत भोसले | |
| 16 | जिथे मुळे रुजली आणि पंख विस्तारले ! – प्रा .सविता गायके | |
| 17 | Motivation is crucial for college students – प्रा.निलेश कल्याणकर | |
| 18 | कल्चरल अक्टीविटी | |
| 19 | Student Section – विद्यार्थी विभाग | |
| | | |
| | | |

## Chief Patrons



**Dr Subhash Jhavar**
Chairman-IIRW



**Ar Dilip Sarda**
Vice Chairman-IIRW



**Dr Sachin Jhavar**
Secretary-IIRW



**Dr Kalpana Jhavar**
Member-IIRW

## Patrons



**Dr C. S. Padmavat**
Campus Director - ICEEM



**Dr R. R. Deshmukh**
Director - ICEEM

## Convener



**Prof. H. M. Jadhav**
IQAC Coordinator



**Prof. A. B. Humbe**
Student Council Incharge

## Co-Convener



**Prof. Nitin Magar**
ICEEM, Waluj.



**Dr Goutam G Saha**
Director-Strategic Development,

## Chief Editor



Dr Goutam Saha

## Managing Editor



Mr Achyut Bhosle

## Faculty Journalist

**Prof. M. P. Kale,** HOD FE
**Prof. Shivram Janjal,** HOD Mechanical
**Prof. Vinod Shikhare,** HOD Civil
**Prof. Sayyad Akhtar**
**Prof. Mangal Kale**
**Prof. Savita Gawande**
**Prof. Jyoti Dighole**

## Student Council



## 2K25 (ICEEM Magazine)

# संपादकीय मंडळ:

## मुख्य मार्गदर्शक



**श्री. डॉ. सुभाष झवर**
मा. अध्यक्ष



**श्री. दिलीप सारडा**
मा. उपाध्यक्ष



**श्री. डॉ.सचिन झवर**
मा. सचिव



**सौ. डॉ. कल्पना झवर**
मा. संचालक

## मार्गदर्शक



**डॉ. सी. एस. पद्मावत**
कॅम्पस डायरेक्टर



**डॉ. आर. आर. देशमुख**
डायरेक्टर

## विनित



**प्रा. हेमंत जाधव**
(उप प्राचार्य)



**प्रा. आनंद हुंबे**
(डीन ऍडमिशन)



**नितीन मगर**
प्राचार्य-आयसीम पॉलिटेक्निक



**डॉ. गौतम सहा**
(स्ट्रॅटेजिक डायरेक्टर)

# विभाग प्रमुख & समन्वयक

## EEE & AIML



प्रा. हेमंत जाधव



प्रा. स्वप्निल ताथे

## CSE



प्रा. सयद अख्तर



प्रा. जफर उलहासन

## CIVIL



प्रा. विनोद शिखरे



प्रा. निकिता पाटील

## Mechanical



प्रा. शिवराम जंजाळ



प्रा. वाय एम खान

## MBA



डॉ. दीपमाला बिरादार



प्रा. सविता गायके

## POLY



प्रा. नितीन मगर



प्रा. ज्योती डिघोळे

## प्रथम वर्ष



प्रा. सविता गावंडे



प्रा. मंगल काळे

# Editorial Message



**Dr Goutam G Saha**
Director-Strategic Development,
ICEEM, Waluj Chh. Sambhajinagar

Dear Readers,

It gives me immense pleasure to present to you the latest edition of our college magazine—a vibrant tapestry of ideas, creativity, and youthful spirit. Each page of this issue reflects the voices, dreams, and perspectives of our students, capturing the energy that defines our campus. A college is more than classrooms and corridors; it is a living community where curiosity is nurtured, talents are discovered, and identities take shape. This magazine is a testament to that journey. Through articles, artwork, poetry, research, and reflections, our contributors have opened windows into their minds and hearts, offering insights that inspire and stories that resonate.

In an age where information travels fast and attention is fleeting, this magazine stands as a reminder of the beauty of thoughtful expression and meaningful dialogue. I applaud every student who took the time to write, create, and collaborate. Your contributions enrich not just these pages, but the spirit of our institution.

A heartfelt thank you to the editorial team and faculty mentors whose dedication made this publication possible. Their commitment transformed raw ideas into a cohesive, compelling issue.

As you explore this edition, I hope it sparks curiosity, encourages reflection, and celebrates the endless potential within each of us. May it remind us that every voice matters—and every story is worth telling.

Happy reading!

**Dr. Goutam G Saha**
— Chief Editor

# विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याची पायाभरणी



**डॉ. सुभाष झवर**
अध्यक्ष

एखादी महत्व पुणर गोष्ट सांगायची म्हटली की, स्वामी विवेकानंद यांचे विचार आठवतात, त्यांची मदत घेतली की, आपले सांगणे सोपे होते.

"Talk to yourself once in a day, otherwise you may miss meeting an intelligent person in this world."
"You cannot believe in God until you believe in yourself."

"You have to grow from the inside out.

मला काय म्हणायचे आहे ते कळले असेल. मला संस्थेच्या अनेक महत्त्वपूर्ण क्षणाचे साक्षीदार होताना मिळाले याचा विशेष आनंद होत आहे. IIRW,S संस्थेचे संस्थापक, विजेंद्र काबरा यांनी पाहिलेले स्वप्न साकार झाले आहे. त्यांचे हे दूरदृष्टीचे स्वप्न केवळ एका इमारतीच्या उभारणीपुरते मर्यादित नसून, ते हजारो विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याची पायाभरणी करणारे आहे.

विजेंद्रजी काबरा यांचे मी मन:पूर्वक स्मरण करतो. त्यांनी कठोर परिश्रमातून आणि समर्पित भावनेतून हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे, याचे जे समाधान त्यांना मिळत असेल, त्याची कल्पना मी करीत आहे. आपण शून्यातून हा प्रवास सुरु केला. अनेक अनुभव घेतले.पण आज ज्या ठिकाणी उभे आहोत, त्याचे समाधान वाटते. आपण सामाजिकता जपतो, त्यामुळेच कमी शुल्क घेऊनही आनंद मोठा असतो.

ICEEM इंजिनिअरिंग कॉलेजचा अध्यक्ष या नात्याने, मी या संस्थेच्या प्रगतीसाठी आणि यशासाठी माझ्या शुभेच्छा व्यक्त करतो. ही संस्था अशीच उत्कृष्ट शिस्त आणि अखंड प्रगती करत राहो. संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्याला त्यांच्या वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

या संस्थेमुळे शिक्षण क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण होईल, नवे आधारस्तंभ तयार होतील असा मला विश्वास आहे.

धन्यवाद!

# ज्ञान आणि कौशल्ये हेच तुमचे सामर्थ्य



दिलीप सारडा
उपाध्यक्ष

इंजिनिअर विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो, तुम्ही सर्वजण ज्ञानाच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर आहात. इंजिनिअरिंगचे हे क्षेत्र केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर ते सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि कठोर परिश्रमाचे प्रतीक आहे. मला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या एका प्रसिद्ध ओवीची आठवण होते, जी आपल्यासाठी एक दीपस्तंभ ठरू शकते: "माझा मराठाचि बोलु कवतिके । परि अमृतातेहि पैजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥"

या ओवीचा अर्थ असा आहे की, माझी मराठी भाषा इतकी गोड आणि सामर्थ्यवान आहे की, ती अमृतालाही पैजेत जिंकेल. परंतु, यातून आपल्याला एक गहन आणि व्यापक संदेश मिळतो, जो तुमच्या इंजिनिअरिंगच्या प्रवासाला प्रेरणा देईल.आत्मविश्वास आणि सामर्थ्याची जाणीव (माझा मराठाचि बोलु कवतिके) ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या भाषेच्या सामर्थ्यावर जो उत्कट आत्मविश्वास व्यक्त केला, तोच आत्मविश्वास तुमच्या अंगी असणे आवश्यक आहे. तुम्ही निवडलेले क्षेत्र हे भविष्याचा वेध घेणारे आहे. तुमच्या बुद्धीवर, तुमच्या कल्पनाशक्तीवर आणि तुमच्या मेहनतीवर विश्वास ठेवा.

"माझ्यात क्षमता आहे" हा आत्मविश्वास तुम्हाला मोठे आणि कठीण प्रकल्प हाती घेण्यासाठी बळ देईल. आपले ज्ञान आणि कौशल्ये हेच तुमचे सामर्थ्य आहे. उत्कृष्टता आणि गुणवत्तेसाठी प्रयत्न (अमृतातेहि पैजा जिंके) या ओवीचा गाभा आहे, उत्कृष्टता! अमृतालाही जिंकण्याची भाषा करणे म्हणजे सामान्य नाही, तर सर्वोच्च गुणवत्ता साधण्याची इच्छा आहे. तुमचे इंजिनिअरिंगचे काम हे नुसते 'कामचलाऊ' नसावे, तर ते 'उत्कृष्ट' असावे. तुम्ही बनवलेले सॉफ्टवेअर असो, डिझाईन केलेले मशीन असो. बदलत्या काळानुसार शिक्षणाचे महत्त्व खरोखरच बदलले आहे आणि ते आता पूर्वीपेक्षा अधिक व्यापक आणि गतिशील बनले आहे.

या बदलाचे काही महत्त्वाचे पैलू आहेत

माहितीचा स्फोट आणि त्वरित उपलब्धता (Information Explosion): आता केवळ पुस्तकी ज्ञान पाठ करणे पुरेसे नाही. माहिती इंटरनेटवर त्वरित उपलब्ध आहे. महत्त्व ज्ञानाचा साठा करण्यात नसून, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणे, तिचे मूल्यांकन करणे आणि ती प्रभावीपणे वापरणे यामध्ये आहे.

**कौशल्यांवर अधिक लक्ष (Focus on Skills)**

पारंपारिक पदव्यांबरोबरच, रोजगारासाठी आवश्यक असलेल्या विशिष्ट कौशल्यांना (Skills) अधिक महत्त्व दिले जात आहे. यात समस्या सोडवणे (Problem Solving), गंभीर विचार (Critical Thinking), संवाद (Communication), सहयोग (Collaboration) आणि डिजिटल साक्षरता (Digital Literacy) यांचा समावेश आहे.

**आयुष्यभर शिकणे (Lifelong Learning)**

तंत्रज्ञान आणि उद्योग खूप वेगाने बदलत आहेत. एकदा घेतलेले शिक्षण आता संपूर्ण आयुष्यभर पुरत नाही. सतत नवीन गोष्टी शिकण्याची आणि स्वतःला अद्ययावत ठेवण्याची (Upskilling and Reskilling) क्षमता हे आजच्या शिक्षणाचे केंद्रस्थान आहे.

**तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण (Integration of Technology)**

शिक्षणात आता केवळ संगणकाचे ज्ञान नसून, तंत्रज्ञानाचा वापर करून शिकणे आणि काम करणे अपरिहार्य झाले आहे. ऑनलाइन शिक्षण (Online Learning), मिश्रित शिक्षण (Blended Learning) आणि शैक्षणिक साधने (Ed-Tech Tools) यामुळे शिक्षणाची पोहोच आणि पद्धत बदलली आहे. व्यक्तिमत्त्व विकास आणि भावनिक बुद्धिमत्ता (Personality & Emotional Intelligence)

केवळ शैक्षणिक गुणच नाही, तर भावनिक बुद्धिमत्ता (EQ), लवचिकता (Resilience), अनुकूलता (Adaptability) आणि नैतिक मूल्ये देखील यशस्वी होण्यासाठी तेवढीच महत्त्वाची मानली जातात. थोडक्यात, आजच्या काळात शिक्षणाचे महत्त्व केवळ नोकरी मिळवण्यासाठी नसून, बदलत्या जगात यशस्वीपणे जगण्यासाठी, सतत शिकत राहण्यासाठी मनाची तयारी ठेवा.



**डॉ. सचिन झवर**
सचिव

# आयसीमच्या विद्यार्थ्यांना नोकरी देणारे बनवा

विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात उत्कृष्टता साधण्यासाठी केवळ पदवी मिळवण्यावर नव्हे, तर विषयांचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यावर भर दिला पाहिजे असा माझा आग्रह असतो. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशीन लर्निंग (ML), इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), आणि डेटा सायन्स यांसारख्या नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचे महत्त्व पटवून द्यावे आणि ते शिकण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थ्यांना त्यांच्या तांत्रिक कौशल्यांसोबतच सॉफ्ट स्किल्स जसे की संवाद, टीमवर्क, आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्यास प्रवृत्त करावे, कारण उद्योगात यांची मोठी मागणी असते.

आता काळ बदलत चालला‌य. बदलत्या काळाप्रमाणे नोकरीच्या शोधात न राहता नवीन स्टार्टअप्स सुरू करण्यासाठी आणि नोकरी देणारे बनण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.त्यांच्या करिअरमध्ये आणि वैयक्तिक जीवनात उच्च नैतिक मूल्ये जपण्याचे महत्त्व सांगावे.सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करावी. अभियांत्रिकी क्षेत्रात वेगाने होणाऱ्या बदलांमुळे सतत शिकत राहणे किती महत्त्वाचे आहे हे लक्षात घ्यावे.

आपले इंजिनिअरिंग कॉलेज ही केवळ शिक्षण देणारी संस्था नाही, तर ते नवनिर्मितीचे केंद्र आहे. आपल्या कॉलेजमधून अनेक यशस्वी उद्योजक (Entrepreneurs) तयार झाले आहेत, ज्यांनी केवळ स्वतःच्या कंपन्याच नाही, तर हजारो लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत. हा आपला गौरवशाली भूतकाळ आहे, आणि या परंपरेला साजेशे काम आपण करीत आहोत.

आजच्या विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची, ऊर्जेची आणि क्षमतांची कोणतीही कमतरता नाही. त्यांना फक्त योग्य दिशा आणि प्रेरणा (Motivation) देण्याची गरज आहे. नोकरी-शोधक (Job-Seekers) नको, नोकरी-निर्माते (Job-Creators) व्हा!
केवळ पुस्तकी ज्ञान नको, तर बाजारातील आव्हाने (Market Challenges) स्वीकारण्याची तयारी हवी!



डॉ. कल्पना झवर
संचालक

# स्वप्नांना पंख देणारे मंदिर

प्राध्यापक आणि शिक्षकवृंद, कर्मचारी वर्ग, आणि माझ्या प्रिय विद्यार्थिनींनो...

मला आपल्या महाविद्यालयाच्या कार्याचा आणि भूमिकेचे खूप समाधान वाटते. महाविद्यालयाचे प्रांगण हे केवळ इमारती आणि पुस्तके यांनी बनलेले नाही, तर ते हजारो स्वप्ने आणि अमर्याद आशावादाचे एक प्रेरणास्त्रोत आहे.

आपल्या महाविद्यालयात मोठ्या संख्येने मुली शिक्षण घेत आहेत आणि यातील अनेक मुली ग्रामीण भागातून आलेल्या आहेत. त्या मोठी स्वप्ने घेऊन शहरात येतात. त्यांच्या डोळ्यांत भविष्याची एक उज्ज्वल कल्पना असते, आणि त्या कल्पनेला सत्यात उतरवण्यासाठी त्या अथक परिश्रम घेण्यास तयार असतात.

मला हे सांगताना अतिशय आनंद होत आहे की, आमचे महाविद्यालय या मुलींच्या स्वप्नांना नवी दिशा आणि बळ देत आहे. त्यांना खऱ्या अर्थाने त्यांच्या आयुष्यात इथे 'पंख' मिळतात. शिक्षणातून मिळणारी आत्मशक्ती, आत्मविश्वास आणि ज्ञान हेच त्यांचे खरे पंख आहेत, जे त्यांना यशाच्या शिखरापर्यंत घेऊन जातील.

या मुलींच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास, त्यांचे यश आणि त्यांची प्रगती पाहणे, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी आनंदाची गोष्ट आहे. मी शिक्षक, कर्मचारी यांना आवाहन करते की, या मुलींचे भविष्य साकार करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून कठोर प्रयत्न करावेत. त्यांची शैक्षणिक, मानसिक आणि सामाजिक प्रगती सुनिश्चित करण्याची जबाबदारी आपण सर्वांनी घ्यावी.

या मुली देशाचे आणि समाजाचे भविष्य आहेत. त्यांचे भविष्य उज्ज्वल करणे, हेच आपले परम कर्तव्य आहे. चला, आपण सर्वजण मिळून या स्वप्नाळू मुलींना त्यांच्या पंखांमध्ये अधिक बळ नि्मारण केले पाहिजे.

आज या वास्तूच्या निर्मितीकडे पाहताना, मला केवळ एक इमारत दिसत नाहीये, तर अनेक मुलींचे उज्ज्वल भविष्य आकार घेताना दिसत आहे. हे समाधान केवळ मोठे नाही, तर ते आत्मिक आणि परिपूर्ण आहे. 'अत्यंत चांगल्या सुविधा' हा केवळ शब्दप्रयोग नाही, तर आम्ही पूर्ण केलेली एक प्रतिज्ञा आहे. सर्व सुविधांमध्ये उत्कृष्ट आणि अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था हीआमची पहिली प्राथमिकता होती.

या सुविधा फक्त सोयीसाठी नाहीत, तर त्यांच्या भविष्याच्या बळकट पायाभरणीसाठी आहेत. येथील प्रत्येक विद्यार्थिनी आत्मविश्वासाने आणि आनंदाने या वातावरणाचा उपयोग करून आपले ध्येय साधत आहे, तेव्हा मला आमच्या कष्टाचे खरे फळ मिळाल्याचे जाणवते.

# कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी आणि आव्हाने



रत्नदीप देशमुख
प्राचार्य, ICEEM

21व्या शतकातील सर्वात प्रभावशाली आणि झपाट्याने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानांपैकी एक म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI). मानवी बुद्धिमत्तेची नक्कल करणारे संगणकीय प्रणाली निर्माण करण्याचे तंत्रज्ञान म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. आज AI केवळ विज्ञानकथा किंवा प्रयोगशाळेपुरते मर्यादित न राहता आपले जीवन, उद्योग, आरोग्य, शिक्षण आणि अर्थव्यवस्था यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रवेश करत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे समाजाला अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध होत आहेत. पण त्याच वेळी याचे काही गंभीर आव्हाने आणि जोखमी देखील आहेत, ज्यांवर लक्ष देणे अत्यावश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) म्हणजे संगणक किंवा यंत्रणामार्फत अशी कार्ये करणे, जी सामान्यतः मानवी बुद्धिमत्तेमार्फत केली जातात. यात खालील गोष्टींचा समावेश होतो.

समस्या सोडवणे (Problem Solving), शिकणे (Learning), भाषा समजणे व वापरणे (Natural Language Processing),
दृष्टी व आवाज ओळखणे (Vision and Speech Recognition), निर्णय घेणे (Decision Making)

**AI चे प्रमुख तीन प्रकार आहेत:**

नॅरो AI (Narrow AI): विशिष्ट कार्यासाठी तयार केलेली AI प्रणाली. उदा. Google Assistant, ChatGPT.
जनरल AI (General AI): मानवासारखी सर्वसामान्य बुद्धिमत्ता असणारी कल्पित प्रणाली.
सुपरइंटेलिजन्स (Superintelligence): मानवाच्या क्षमतेपेक्षा अनेक पटीने अधिक बुद्धिमान प्रणाली – ही सध्या केवळ संकल्पनात्मक आहे.

**AI द्वारे उपलब्ध होणाऱ्या संधी**

1. आरोग्यसेवा क्षेत्रातील क्रांती: AI मुळे आरोग्य क्षेत्रात खालील बदल घडत आहेत. उदा.
रोगांची लवकर ओळख: एक्स-रे, एमआरआय इमेजेसचे विश्लेषण करून कर्करोग, हृदयरोग यांचे लवकर निदान.
व्यक्तिगत औषधोपचार: AI मुळे रुग्णांच्या DNA चा अभ्यास करून वैयक्तिक उपचार पद्धती ठरवता येते.
व्हर्च्युअल डॉक्टर: AI-आधारित चॅटबॉट्स रुग्णांचे लक्षण विचारून प्राथमिक सल्ला देऊ शकतात.
रूग्णालय व्यवस्थापन: बेड व्यवस्थापन, औषध साठा, आपत्कालीन परिस्थिती याचे पूर्वानुमान.
2. शिक्षण क्षेत्रात सुधारणा: AI शिक्षण अधिक प्रभावी आणि व्यक्तिगत पद्धतीने देण्यासाठी मदत करते. उदा.
स्मार्ट ट्यूटरिंग: विद्यार्थ्यांच्या गतीनुसार शिक्षण देणारी प्रणाली. स्वयंमूल्यांकन: परीक्षांचे ऑटोमेटेड तपासणी करणे.
भाषा शिक्षण: भाषेचे योग्य उच्चार, व्याकरण शिकवण्यासाठी NLP वापर. शिक्षणातील डेटा विश्लेषण: कोणता विद्यार्थी मागे आहे हे ओळखणे.
3. व्यवसाय व अर्थव्यवस्थेत वाढ : AI मुळे व्यवसायातील कार्यक्षमता वाढते. उदा. ग्राहक सेवा: 24/7 उपलब्ध असणारे चॅटबॉट्स.
मार्केटिंग व जाहिरात: ग्राहकांच्या गरजेनुसार वागणुकीवर आधारित वैयक्तिक ऑफर. सप्लाय चेन व्यवस्थापन: मालाच्या हालचालींचा अंदाज व नियोजन. भरती प्रक्रिया: रेज्युमे स्क्रिनिंग, मुलाखत विश्लेषण करणे.
4. कृषी व अन्न सुरक्षा: AI आधारित प्रगत शेती करता येते. उदा.
ड्रोनद्वारे पीक निरीक्षण करणे. कीड व रोग ओळख करणे. जमिनीतील आर्द्रता मोजणारी सेन्सर्स. पिकांचे उत्पन्न व हवामान बदल याचे अंदाज बांधता येतात.
5. पर्यावरण रक्षण व हवामान बदल: AI पर्यावरणाच्या संवर्धनात मोठी भूमिका बजावत आहे. उदा.
वनतोड व प्रदूषण याचे निरीक्षण करणे. स्मार्ट एनर्जी मॅनेजमेंट करणे. नैसर्गिक आपत्तींचा पूर्वानुमान. जल, वायु गुणवत्ता मोजणी व कृती योजना आखणे.

6. सार्वजनिक सुरक्षा व कायदा अंमलबजावणी: उदा.
गुन्ह्यांचे विश्लेषण व पूर्वानुमान (Predictive Policing) करणे. चेहरा ओळखून संशयित व्यक्तींची माहिती मिळवणे. सुरक्षा कॅमेऱ्यांचे विश्लेषण करणे. सायबर सुरक्षेमधील हल्ले ओळखणे.
AI संबंधित आव्हाने: AI च्या उपयोगात अनेक गंभीर आव्हानेही समोर येत आहेत:
1. नैतिक )Ethical) समस्या: उदा.
अल्गोरिदमचा पक्षपातीपणा: चुकीच्या डेटावर आधारित प्रणाली भेदभाव करू शकते.
"ब्लॅक बॉक्स" समस्या: निर्णय कसे घेतले गेले हे समजत नाही. खाजगीपणाचा भंग: वैयक्तिक माहिती गोळा केली जाते.
मानवाच्या स्वायत्ततेवर धोका: विशेषत: शस्त्रसज्ज AI प्रणालींत मानवाच्या स्वायत्ततेवर धोका निर्माण होऊ शकते.
२. नोकऱ्यांची घसरण: उदा.
स्वयंचलित यंत्रांमुळे मजूर, चालक, कॅशियर यांची नोकरी धोक्यात येऊ शकते.
संगणकीय कामे – डेटा एन्ट्री, लेखांकन यासाठीही AI मारफत सुविधा उपलब्ध. पुन्हा कौशल्ये शिकण्यासाठी प्रशिक्षण गरजेचे.
3. सुरक्षा धोक्यांमध्ये वाढ: उदा.
डीपफेक व्हिडीओज व बनावट माहितीचा गैरवापर होऊ शकतो. हॅकिंगसाठी AI वापर होऊ शक होऊ शकतो.
स्वयंचलित हल्लेखोर ड्रोन, यंत्र यांचा धोका संभवतो.
AI वर आधारित सायबर गुन्हे वाढ होऊ शकते.
४. नीती व नियमनाचा अभाव: उदा.
AI साठी कोणते कायदे लागू होणार याचे स्पष्ट धोरण नाही.
देशानुसार नियमानुसार फरक आसू शकतो. डेटा मालकी व गोपनीयतेवरील वाद निर्माण होऊ शकतो.
५. मानवी कौशल्यांचा ऱ्हास: उदा.
AI मुळे व्यक्ती स्वत: विचार करण्यापेक्षा यंत्रांवर अवलंबून राहतो.
टेक्स्ट जनरेशन, नकाशा वापर इत्यादींमुळे मूळ कौशल्ये कमी होतात.
६. अस्तित्ववादी धोका (Existential Risk): AI जर अत्यंत प्रगत झाला, तर:
मानवाचा नियंत्रणाचा अभाव निर्माण होऊ शकतो.
AI च्या उद्दिष्टांचा मानवहिताशी मेळ नसेल.
सुपरइंटेलिजन्स मुळे धोका संभवतो.
उत्तरदायित्वपूर्ण AI साठी खालिल उपाययोजना करणे आवश्यक आहे.
१. नीती व नैतिक मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे :- OECD, UNESCO सारख्या संस्था नैतिक AI साठी मार्गदर्शक तत्वे देत आहेत.
पारदर्शकता, जबाबदारी, समावेश व मानवकेंद्रितता महत्त्वाची.
२. सर्वसमावेशक सहभाग :- AI च्या विकासात विविध सामाजिक स्तरातील, लिंग, धर्म, वंशीयता यांचे प्रतिनिधित्व आवश्यक.
जास्तीत जास्त लोकांपर्यंत AI शिक्षण पोहोचवणे.
३. सरकारी भागीदारीची आवश्यकता :-सहकार्याने धोरणे तयार करणे आवश्यक आहे.
AI साठी आवश्यक संशोधनाला प्रोत्साहन आवश्यक आहे.
४. शिक्षण व कौशल्य विकास :-AI संबंधित शिक्षण शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट करणे.
पुन: कौशल्य प्राप्ती साठी ट्रेनिंग प्रोग्राम.
५. जागतिक सहकार्य :- AI संबंधी जागतिक करार, नियम, सुरक्षा संहितांचा विकास करणे आवश्यक आहे.
AI शस्त्रास्त्रांच्या मर्यादेबाबत करार करणे आवश्यक आहे.

# विद्यार्थी 'जॉब रेडी' (Job Ready) झाला पाहिजे



डॉक्टर सी एस पद्मावत
कॅम्पस डायरेक्टर, आयसीम कॉलेज

**अभियांत्रिकी कॉलेज निवड : केवळ इमारत नव्हे, तर शिक्षकांचे महत्त्व!**

प्रिय पालक आणि विद्यार्थी मित्रांनो,

अभियांत्रिकी महाविद्यालयाची निवड करताना आपल्या मनात अनेक प्रश्न आणि उत्सुकता असणे साहजिक आहे. प्रवेशाच्या वेळी, महाविद्यालयाच्या भव्य इमारती, सुसज्ज प्रयोगशाळा आणि आधुनिक कॅम्पस पाहून आपण खूप प्रभावित होतो. निश्चितच, उत्तम पायाभूत सुविधा आवश्यक आहेत; परंतु, केवळ इमारतींच्या सौंदर्यावर आणि दिखाव्यावर न जाता, शिक्षणाच्या मूळ स्तंभाकडे लक्ष देणे किती महत्त्वाचे आहे, हे मला तुमच्यासमोर स्पष्ट करायचे आहे.

**पायाभूत सुविधा vs. शिक्षकांचे योगदान**

एक उत्तम इमारत ही एखाद्या शरीराप्रमाणे असते, पण त्या शरीराला खरी ऊर्जा आणि दिशा देणारा 'आत्मा' म्हणजे शिकवणारे शिक्षक होय.

अभियांत्रिकी (Engineering) हे शिक्षण सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित नाही. ते १००% 'प्रॅक्टिकल बेस' आणि 'इंडस्ट्री बेस' आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या औद्योगिक जगात यशस्वी होण्यासाठी, विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच 'कौशल्ये' (Skills) आणि 'अनुभव' (Experience) मिळणे आवश्यक आहे.

आम्ही या तत्त्वावर ठाम विश्वास ठेवतो. केवळ पदवी मिळवून चालणार नाही, तर विद्यार्थी 'जॉब रेडी' (Job Ready) झाला पाहिजे.

**शिक्षकांचे खरे महत्त्व**

१. उद्योगाशी जोडणी (Industry Connect):- आमचे शिक्षक केवळ प्राध्यापक नाहीत, तर ते उद्योगातील बदल आणि गरजांशी सतत जोडलेले असतात. ते विद्यार्थ्यांना केवळ 'काय' आहे हे न शिकवता, 'ते कसे काम करते' आणि 'उद्योगक्षेत्रात त्याचा उपयोग कसा करायचा' हे शिकवतात.

२. गुणवत्तापूर्ण शिक्षण (Quality Education):- उत्कृष्ट, अनुभवी आणि समर्पित शिक्षकच क्लिष्ट संकल्पना सोप्या भाषेत समजावून सांगू शकतात. ते विद्यार्थ्यांमध्ये केवळ 'अभ्यास' करण्याची नव्हे, तर 'संशोधन' (Research) करण्याची आणि 'नवीन निर्मिती' (Innovation) करण्याची जिज्ञासा निर्माण करतात.

३. प्रत्यक्ष अनुभव (Hands-on Experience):- उत्कृष्ट प्राध्यापक विद्यार्थ्यांना वर्गखोल्यांतून बाहेर काढून प्रयोगशाळा, कार्यशाळा (Workshops) आणि थेट औद्योगिक प्रकल्पांवर काम करण्याची प्रेरणा देतात. हेच प्रॅक्टिकल ज्ञान भविष्यात त्यांना यशस्वी करिअरसाठी तयार करते

ICEEM पॅटर्न आम्ही याची खात्री देतो की, आम्ही केवळ उत्तम शिक्षकच नव्हे, तर 'मार्गदर्शक' (Mentors) नेमले आहेत. आमच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली, विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे आणि उद्योग-केंद्रित शिक्षण मिळते.

माझी पालक आणि विद्यार्थ्यांना कळकळीची विनंती आहे की, कृपया कॉलेज निवडताना इमारतीसोबतच तिथल्या शिक्षकांच्या गुणवत्तेची, त्यांच्या अनुभवाची आणि त्यांच्या अध्यापन पद्धतीची माहिती घ्या.

जेथे शिक्षण प्रॅक्टिकल बेस आणि इंडस्ट्री बेस दिले जाते, तिथेच तुमचा प्रवेश सुरक्षित करा. कारण, अभियांत्रिकीमध्ये शिक्षकांचे ज्ञान हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारे खरे भांडवल आहे! या कसोट्यावर आयसीम कॉलेज उतरले आहे. हे नक्की!

धन्यवाद!

# संक्षिप्त आढावा...



**प्रा. हेमंत लक्ष्मण जाधव**
उपप्राचार्य आयसीम, छ. संभाजीनगर

**ICEEM इंजिनिअरिंग, पॉलीटेक्निक व एमबीए महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक – "संवाद 2K25" प्रकाशनाच्या निमित्ताने घेतलेला हा संक्षिप्त आढावा...**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ICEEM संस्थेत यावर्षीदेखील दर्जेदार तांत्रिक शिक्षणासोबत नावीन्यपूर्ण, कौशल्याधारित व उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची प्रभावी सांगड घालून विविध शैक्षणिक, तांत्रिक, सांस्कृतिक व स्पर्धात्मक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हा संस्थेचा मुख्य उद्देश असून त्यानुसार वर्षभर विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

या अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी १० पेक्षा अधिक औद्योगिक भेटी (Industrial Visits) आयोजित करण्यात आल्या. विविध उद्योगसमूहांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रियेचे ज्ञान मिळाले तसेच उद्योगविश्वातील बदलत्या तंत्रज्ञानाची माहिती मिळाली. याशिवाय विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे तांत्रिक व्याख्याने, मार्गदर्शन सत्रे व व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील क्रीडागुण व सांस्कृतिक प्रतिभेला वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

आय.ई.टी.ई. (IETE) च्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात "TEKHNIKOS-2K25" हा कॉलेज स्तरावरील तांत्रिक महोत्सव यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विविध तांत्रिक स्पर्धा, प्रेझेंटेशन्स, प्रोजेक्ट प्रदर्शन आणि नवोपक्रमाशी संबंधित उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या तांत्रिक कौशल्यांचे प्रदर्शन करण्याची उत्तम संधी मिळाली.

शिक्षकांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागावी व शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावावी यासाठी विविध कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम व सेमिनार्स आयोजित करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञान व अध्यापन पद्धतींचा प्रभावी वापर करून शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण करण्यासाठी शिक्षक सातत्याने प्रयत्नशील आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षक-पालक मेळावा आयोजित करण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अभ्यासाची प्रगती, त्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर उपाययोजना याबाबत पालकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची सवय सुधारण्यासाठी नाईट स्टडी शेड्युल व मॉर्निंग स्टडी शेड्युल यांसारख्या उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली.

महत्त्वाची बाब म्हणजे, महाविद्यालय चालू असताना मोबाईल फोनच्या वापरास बंदी असलेले ICEEM हे महाराष्ट्रातील मोजक्या महाविद्यालयांपैकी एक ठरले आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण आले असून विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष संवाद, परस्पर सहकार्य व मैत्री अधिक दृढ होण्यास मदत झाली आहे, असे मत अनेक विद्यार्थी व पालकांनी व्यक्त केले.

पारंपरिक क्लासरूम शिक्षण पद्धतीसोबतच डिजिटल शिक्षणालाही प्राधान्य देण्यात आले आहे. YouTube, Zoom, Google Classroom, Google Meet आणि Virtual Labs यांसारख्या आधुनिक डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना Blended Learning पद्धतीने शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांच्या संकल्पना अधिक स्पष्टपणे समजून घेण्यास मोठी मदत झाली आहे.

व िद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच शैक्षणिक गुणवत्तावृद्धीसाठी ICEEM संस्था सदैव कटिबद्ध व तत्पर आहे. या कार्यासाठी लाभलेल्या मार्गदर्शनाबद्दल आदरणीय अध्यक्ष डॉ. सुभाष झवर, सचिव डॉ. सचिन झवर, उपाध्यक्ष श्री. दिलीप सारडा, विश्वस्त डॉ. कल्पना झवर, तसेच संचालक डॉ. रत्नदीप देशमुख व डॉ. चंद्रप्रकाश पद्मावत यांचे मनःपूर्वक आभार.

**– प्रा. हेमंत जाधव**
**उपप्राचार्य, ICEEM, CSN**

## International Centre of Excellence in Engineering & Management (ICEEM)

### Institute Activity Report 2024-25 (Ist Sem)

| Sr. No. | Activity | Date | Expert Guest | Coordinator | Venue |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Expert Talk on "Innovation in Teaching Learning and Research | 21.12.2024 | Prof. Dr. Vijay Pandharipande | Dr. Ratnadeep Deshmu Dr. C.S. Padmavat Prof. H.L. Jadhav | ICEEM College |
| 2 | Food Distribution to Blind Girls | 08.12.2024 | | Prof. Tushar Mishra | Ranglalji Ramratnaji Bahe Residential Industrial Vocational Centre for Blin Girls |
| 3 | Yoga Session | 30.11.2024 | Mrs. Sulbha Ther | Prof. Akash Wankhede | Seminar Hall, ICEEM |
| 4 | Voting Awareness Program | 18.11.2024 | Dr. Ratnadeep Deshmukh Dr. C.S. Padmavat Pr H.L. Jadhav | Prof. A.B. Humbe | NSS ICEEM |
| 5 | Online Guest Lecture on "JAVA Networking" | 14.11.2024 | Dr. Anil V. Turukmane, Professor CSE, Vellore Institute of Technology, Andhra Pradesh. | Dr. Sangita Kakarwal Prof. Manisha Kharat | Online mode ICEEM College |
| 6 | Industrial Visit (MBA) | 12.11.2024 | | Dr. Deepmala Biradar | Leso-Kart and Endress+Hauser, MIDC Waluj. |
| 7 | Night and Morning Study Schedule | 11.11.2024 to 17.12.2024 | College Activity | Dr. Ratnadeep Deshmu Dr. C.S. Padmavat Prof. H.L. Jadhav | ICEEM College |
| 8 | Online Guest Lecture on " Event Handling in JAVA" | 09.11.2024 | Dr. Seema Chaudhari Associate Professor in CSE, MIT College of Engineering, Chh. Sambhjinagar. | Dr. Sangita Kakarwal Prof. Manisha Kharat | Online mode ICEEM College |
| 9 | Industrial Visit | 03.10.2024 | | Prof. P.U. Bhagat | Crompton Greaves Limite MIDC Waluj. |
| 10 | Expert Talk on Goal Setting in Career | 03.10.2024 | Dr. Deepmala Biradar | Prof. Mangal Kale | Seminar Hall, ICEEM |
| 11 | Fresher's Party for Students | 28.09.2024 | | Prof. Akash Wankhede | Srushti Agro Hotel |
| 12 | Industrial Visit | 28.09.2024 | Mr. Sachin Inamdar Mr. Aniket Dharmadhiakri | Prof. P.U. Bhagat | DECPL, Shendra MIDC |
| 13 | Inauguration of IEC ( Engenious Electro Cavalry) Cell | 21.09.2024 | Mr. Govind Dusange Chief Engineer of MSEDCL | Prof. Sayali Rathod | ICEEM College |
| 14 | Two Days Workshop on IP | 20.09.2024 & 21.09.2024 | Dr. Suryakant Patil | Prof. Sonam Welanjkar | ICEEM College |
| 15 | Induction Program (MBA) | 13.09.2024 | Dr. Vinay Deolankar Mr. Vijay Salve | Dr. Sagar Bhalekar | Seminar Hall, ICEEM |
| 16 | Industrial Visit to L&T Training Centre | 13.09.2024 | | Prof. H.L. Jadhav Prof. Parshuram Kurhe EEE Department | L&T Training Centre, Madh, Mumbai |
| 17 | Industrial Visit (FE) | 23.08.2024 | | Prof. A.B. Humbe | Metal Man Auto Ltd. MIDC Waluj |
| 18 | Industrial Visit (FE) | 24.08.2024 | | Prof. A.B. Humbe | Marathwada Auto Cluster Ltd., MIDC Waluj |
| 19 | Field Visit (EEE) | 22.08.2024 | | Prof. P.V. Kurhe Prof. M.K. Jadhwar | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University |
| 20 | Student Interaction Pragram | 12.08.2024 | Team COEP | Prof. Shivam Gawande Prof. Pallavi Kathar | ICEEM College |
| 21 | Field Visit (EEE) | 10.08.2024 | | Prof. Swapnil Tathe | MSEDCL Substation. Patoda, Sub District Gangapur. |
| 22 | Field Visit (EEE) | 27.07.2024 | | Prof. S.A. Nagarkar | Don Bosco E-Mobility Institute |
| 23 | Alumni Interaction | 24.07.2024 | Dr. Ratnadeep Deshmukh Dr. C.S. Padmavat | Prof. Anand Humbe Prof. Pallavi Kathar | ICEEM College |
| 24 | Extra Classes for GATE Exam Preparation (Online mode) | July 24 to February 25 | | CSE Department | Online mode ICEEM College |
| 25 | Sanwwaad College Magazine Publication | 18.07.2024 | Dr. Subhash Jhavar Mr. Dushant Aathavle Mr. Chetan Raut | Dr. Gautam Saha Prof. Pallavi Kathar | ICEEM College |
| 26 | Plant for Mother | 18.07.2024 | Dr. Ratnadeep Deshmukh Dr. C.S. Padmavat | Prof. Anand Humbe | ICEEM College |
| 27 | Clean-up Drive for Pandharpur Yatra | 17.07.2024 | Ms. Minal Naik Dr. Ratnadeep Deshmukh Dr. C.S. Padmavat | Prof. Anand Humbe Prof. Kiran Chavan | Nagar Naka to Pandharpur Temple |
| 28 | Five Days FDP on Preparation of SSR for NAAC Cycle 2 | 09.07.2024 to 13.07.2024 | Dr. N.S. Padmavat | Prof. H.L. Jadhav | ICEEM College |
| 29 | Seminar on Research and Development | 03.07.2024 | Dr. S.N. Kakarwal | Prof. H.L. Jadhav | ICEEM College |

## International Centre of Excellence in Engineering & Management (ICEEM)

### Institute Activity Report 2024-25 (IInd Sem)

| Sr. No. | Activity | Date | Expert Guest | Coordinator | Venue |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Parent - Teacher Meet | 07.05.2025 | | Prof. A.B. Humbe | ICEEM College |
| 2 | Study Visit at Verul Leni Ellora Caves (Indian Knowledge System) | 21.04.2025 | All First Year Students | Prof. Nilesh Kalyankar | Ellora Caves, Dist. Chh. Sambhajinagar. |
| 3 | Green AI Skilling Programme | 07.04.2025 to 12.04.2025 | Mr. Jitendra Rathod | Prof. Y.M Khan | ICEEM College |
| 4 | Expert Talk on "Cyber Security" | 04.04.2025 | Ms. Priya Ghorde Cyber Investigation and Forensics Specialist, Indian Cyber Crime Coordination Centre, MHA. | Prof. Sujata Chechere | ICEEM College |
| 5 | Expert Talk on "Study in Japan: Opportunities for Indian Students in Higher Education" | 27.03.2025 | Dr. Pankaj Koinkar Vice Director Center of International Research & Education Cooperation Tokushima University, Japan | Prof. Sujata Chechere | ICEEM College |
| 6 | Expert Talk on "Vision to Venture: The Entrepreneur's Journey" | 22.03.2025 | Ms. Manasi Ashutosh Shinde HR & Admin Head, Digvijay Industries. | Prof. Asmita Mathkari | ICEEM College |
| 7 | Expert Talk on "Ethics and Values" | 21.03.2025 to 22.03.2025 | Prof. Zafar-Ul-Hasan Assistant Professor, ICEEM | Prof. Savita Gavande | ICEEM College |
| 8 | Intercollege Technical Event "TEKHNIKO'S 2K25" | 04.03.2025 | | Prof. Sayali Rathod | ICEEM College |
| 9 | Expert Talk on "Investor Awareness and Career Guidance" | 25.02.2025 | Dr. Anil Jadhav Post Coordinator, National Career Service, Ministry of Labor and Employment, Government of India. | Prof. Asmita Mathkari | ICEEM College |
| 10 | Alumni Meet | 23.02.2025 | | Prof. Y.M Khan | ICEEM College |
| 11 | Awareness Camp on Health and Medical Insurance | 14.02.2025 | Mrs. Lata A. Chavan, Mrs. Trupti Rajput & Mr. Shailendrasingh Pardeshi Aditya Birla Health Insurance, Chh. Sambhajinagar. | Prof. A.B. Humbe | ICEEM College |
| 12 | "CESA" Inaugural Function AY 2024-25 | 13.02.2025 | | Prof. Pallavi Kathar | ICEEM College |
| 13 | Expert Guest Lecture on "Artificial Intelligence" | 05.02.2025 | Ms. Swapnali Naik Scientist 'D'/Joint Director, NIELIT Center, New Delhi. | Prof. Sujata Chechere | ICEEM College |
| 14 | Expert Talk on Recent Trends in Embedded System Technology and Career Guidance | 05.02.2025 | Mr. K. Krishna Chaitanya Vector India, Hyderabad | Prof. Sayali Rathod | ICEEM College |
| 15 | 05 Days Online Workshop on "Artificial Intelligence" | 03.02.2025 to 07.02.2025 | Ms. Swapnali Naik Scientist 'D'/Joint Director, NIELIT Center, New Delhi. | Prof. Sujata Chechere | Online Mode |
| 16 | Industrial Visit (EEE) | 30.01.2025 | | Prof. Parshuram Kurhe | Hydroelectric Power Station Jayakwadi, Paithan |
| 17 | Expert Talk on PLC Certificate Course | 24.01.2025 | Mr. Siddharth Magare Programme Co-ordinator, IGTR, Chh. Sambhajinagar. | Prof. Priti Bhagat | ICEEM College |
| 18 | Expert Guest Lecture on "Thermal Face Recognition" | 22.01.2025 | Prof. Kiran Chaudhari Maharashtra Institute of Technology, Chh. Sambhajinagar. | Dr. Sangeeta Kakarwal | ICEEM College |
| 19 | Expert Guest Lecture on "DIPEX" | 16.01.2025 | Mr. Suresh Mane, ABVP | Prof. Sachin Ragade | ICEEM College |
| 20 | Five Days Online Workshop on "Electric Vehicle Master Class" | 29.07.2024 to 02.08.2024 | | Prof. H.L. Jadhav | Online Mode |



प्रा. आनंद हुबें
डीन ॲडमीशन, आयसीम कॉलेज

# लोकशाही बळकट करण्यात अभियांत्रिकीचे योगदान

मतदाराने दिलेले मत योग्य उमेदवारालाच नोंदवले गेले आहे की नाही, हे तपासण्याची संधी VVPAT मुळे मिळते. अभियांत्रिकीचा सहभाग: हे यंत्र एक लहान प्रिंटर (Printer) आणि इलेक्ट्रॉनिक नियंत्रण प्रणाली (Electronic Control System) वापरते, ज्यामुळे मतदाराला त्याची पावती (Receipt) मिळते आणि ती नंतर मतमोजणीसाठी वापरली जाऊ शकते.

खर्च आणि वेळेची बचत (Reducing Cost and Time)

भौगोलिक माहिती प्रणाली (GIS - Geographical Information System): मतदान केंद्रांचे अचूक स्थान निश्चित करणे, मतदारांच्या संख्येनुसार केंद्रांचे वाटप करणे आणि निवडणूक कर्मचाऱ्यांच्या हालचालींचे व्यवस्थापन करण्यासाठी GIS तंत्रज्ञान वापरले जाते. यामुळे संसाधनांचा वापर अनुकूल (Optimal Resource Utilization) होतो आणि खर्च कमी होतो.

क्लाउड-आधारित डेटा व्यवस्थापन (Cloud-Based Data Management): निवडणूक आयोगाच्या डेटाचे संग्रहण, व्यवस्थापन आणि मतदारांची नोंदणी (Voter Registration) ऑनलाइन करणे. यामुळे कागदपत्रांचा वापर कमी होतो आणि डेटा व्यवस्थापन कमी खर्चात आणि कार्यक्षमपणे होते.

सुरक्षितता आणि डेटा संरक्षण (Security and Data Protection)

सायबर सुरक्षा (Cyber Security): मतदारांची माहिती, मतमोजणीचा डेटा आणि निवडणुकीच्या निकालांची माहिती हॅकर्सपासून सुरक्षित ठेवण्यासाठी गुंतागुंतीचे एन्क्रिप्शन (Complex Encryption) आणि सुरक्षा प्रोटोकॉल (Security Protocols) वापरले जातात.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंग (ML): निवडणुकीदरम्यान सोशल मीडियावर पसरणाऱ्या खोट्या बातम्या (Fake News) आणि अफवा (Rumours) ओळखण्यासाठी AI/ML अल्गोरिदमचा वापर केला जात आहे, ज्यामुळे निवडणुकीचे निरोगी वातावरण टिकून राहते.

भावी आव्हाने आणि पुढील वाटचाल (Future Challenges and Way Forward)

रिमोट व्होटिंग (Remote Voting): स्थलांतरित कामगार (Migrant Workers) आणि सैन्यातील जवान (Armed Forces Personnel) यांना त्यांच्या मूळ गावी न जाता मतदान करता यावे यासाठी सुरक्षित डिजिटल व्होटिंग (Digital Voting) प्रणाली विकसित करण्याचे आव्हान अभियांत्रिकीसमोर आहे.

यंत्रणांची टिकाऊ क्षमता (Durability and Resilience): EVM आणि VVPAT यंत्रे उष्णता, आर्द्रता आणि इतर भौगोलिक परिस्थितींमध्ये अधिक प्रभावी आणि टिकाऊ असावीत यासाठी सामग्री अभियांत्रिकी (Material Engineering) आणि डिझाइन सुधारणा (Design Improvements) आवश्यक आहेत.

लोकशाही बळकट करण्यात अभियांत्रिकीचे योगदान: निवडणुका सुरक्षित आणि कार्यक्षम बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर

भारत, जगातील सर्वात मोठी लोकशाही, आपल्या नागरिकांच्या मतदानाच्या शक्तीवर (Electoral Power) उभी आहे. 'लोकांनी, लोकांसाठी चालवलेलं लोकांचं राज्य' या तत्त्वानुसार, निवडणुका हा लोकशाहीचा आत्मा आहे. या निवडणुका निरोगी वातावरणात, पारदर्शकपणे आणि कमी खर्चात होणं अत्यंत आवश्यक आहे. या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि भारतीय लोकशाहीला अधिक बळकट करण्यासाठी अभियांत्रिकी (Engineering) आणि तंत्रज्ञान (Technology) महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

१. मतदान प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक करणे (Simplifying and Ensuring Transparency)

# पॉलिटेक्निकचे महत्त्व आणि आमच्या संस्थेचा दृष्टिकोन



प्रा. नितिन मगर
प्राचार्य, पॉलिटेक्निक, आयसीम कॉलेज

पॉलिटेक्निक (Polytechnic) शिक्षणाचे समाजात आणि विद्यार्थ्यांच्या जीवनात असलेले अत्यंत महत्त्वाचे स्थान तसेच या शिक्षणाला आमचे महाविद्यालय किती बारकाईने आणि समर्पणभावाने हाताळते, यावर चर्चा करणार आहोत.

पॉलिटेक्निकचे महत्त्व (The Importance of Polytechnic)

पॉलिटेक्निक शिक्षण केवळ एक शैक्षणिक पदवी नाही; हे व्यावसायिक कौशल्ये आणि उद्योग-सज्जता (Industry-Readiness) यांचा पाया आहे. त्वरित रोजगारक्षमता (Immediate Employability): तीन वर्षांचा हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना थेट नोकरीच्या संधींसाठी तयार करतो. सैद्धांतिक ज्ञानापेक्षा व्यावहारिक आणि उपयोजित ज्ञानावर अधिक लक्ष केंद्रित केले जाते, ज्यामुळे विद्यार्थी पदवी पूर्ण होताच उद्योगात योगदान देऊ शकतात. मध्यम-स्तरीय व्यवस्थापनाचा कणा (The Backbone of Mid-Level Management): कुशल तंत्रज्ञ आणि पर्यवेक्षक (Supervisors) म्हणून पॉलिटेक्निक पदवीधारक कोणत्याही उद्योगासाठी आवश्यक असतात. ते संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचे काम करतात. उच्च शिक्षणाचा मार्ग (Pathway to Higher Education): पॉलिटेक्निक डिप्लोमाधारक थेट अभियांत्रिकी पदवीच्या (B.E./B.Tech.) दुसऱ्या वर्षात प्रवेश (Lateral Entry) घेऊ शकतात. यामुळे त्यांना वेळेची बचत करून उच्च शिक्षण घेता येते.

उद्योजकतेला प्रोत्साहन (Fostering Entrepreneurship): व्यावहारिक कौशल्ये आणि समस्या सोडवण्याची क्षमता विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आत्मविश्वास देते, ज्यामुळे ते नोकरी मागणारे नाही तर नोकरी देणारे बनतात. आमचे महाविद्यालय पॉलिटेक्निक शिक्षणाचे हे महत्त्व ओळखून, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांना सर्वोत्तम तंत्रज्ञ बनवण्यासाठी कटिबद्ध आहे.

अभ्यासक्रमाचे बारकाईने वाचन (Meticulous Curriculum Focus): उद्योग-आधारित अभ्यासक्रम (Industry-Oriented Curriculum): आम्ही अभ्यासक्रमाचे फक्त अध्यापन करत नाही, तर सद्य उद्योगाच्या गरजांनुसार त्यातील प्रत्येक घटक बारकाईने तपासतो आणि शिकवतो. नियमितपणे औद्योगिक तज्ज्ञांच्या भेटी आयोजित करून विद्यार्थ्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवतो.

प्रॅक्टिकलवर सर्वाधिक भर (Highest Priority on Practicals): आमच्या प्रयोगशाळा अत्याधुनिक साधनांनी सुसज्ज आहेत. आम्ही "करून शिकणे" (Learning by Doing) या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवतो. प्रत्येक विषयासाठी आवश्यक असलेले प्रत्येक प्रॅक्टिकल विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने पूर्ण करावे लागते. छोटी बॅच साइज (Smaller Batch Sizes for Practical): प्रॅक्टिकलसाठी विद्यार्थ्यांच्या लहान बॅच तयार केल्या जातात, जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक लक्ष आणि प्रत्येक उपकरणावर काम करण्याची संधी मिळू शकेल.

शिक्षकांची भूमिका आणि मार्गदर्शन (The Role of Faculty and Mentorship): आमचे शिक्षक अनुभवी असून ते केवळ विषय शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक (Mentors) बनतात. ते केवळ परीक्षेच्या दृष्टिकोनातून नाही, तर उद्योग-जीवनाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना तयार करतात. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीवर वैयक्तिक लक्ष दिले जाते आणि त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष मार्गदर्शन वर्ग घेतले जातात.

सर्वांगीण विकास (Holistic Development): कौशल्ये आणि सॉफ्ट स्किल्स (Technical and Soft Skills): आम्ही तांत्रिक कौशल्यासोबतच संवाद कौशल्ये (Communication Skills), टीमवर्क (Teamwork) आणि समस्या सोडवण्याची क्षमता (Problem-Solving) यासारख्या सॉफ्ट स्किल्सवर सुद्धा भर देतो, जे प्लेसमेंटसाठी तितकेच महत्त्वाचे आहेत. प्लेसमेंट आणि इंटर्नशिप (Placement and Internship): प्लेसमेंट सेल विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्तम कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देतो आणि त्यांना औद्योगिक वातावरणाची सवय लागावी यासाठी नियमितपणे इंटर्नशिप आयोजित केल्या जातात. पॉलिटेक्निक हा तुमच्या यशस्वी भविष्याचा मजबूत आधारस्तंभ आहे. आमचे महाविद्यालय या स्तंभाला अधिक भक्कम करण्यासाठी आणि तुम्हाला उद्योगातील एक उत्कृष्ट व कुशल व्यावसायिक बनवण्यासाठी कटिबद्ध आहे. तुम्ही तुमच्या मेहनतीने आणि आमच्या मार्गदर्शनाने हे ध्येयि नश्चितच गाठाल.

अ. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM - Electronic Voting Machine)

# स्त्री सबलीकरण : 'ऑपरेशन सिंदूर' पासून सीमांवरच्या रणांगणापर्यंत



डॉ. दिपमाला बिरादार
विभाग प्रमुख, एमबीए डिपार्टमेंट, आयसीम कॉलेज

भारत देश प्राचीन संस्कृतीचा आणि विविधतेचा अधिष्ठान असलेला देश आहे. येथे देवींची पूजा केली जाते, स्त्रीला 'शक्ति' मानले जाते. मात्र प्रत्यक्षात स्त्रियांना अनेकदा दुय्यम स्थान दिले जाते. आजच्या युगात स्त्री सबलीकरण ही केवळ सामाजिक चळवळ नसून, राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची मूलभूत गरज बनली आहे. यामध्ये 'ऑपरेशन सिंदूर' हा एक महत्त्वाचा टप्पा ठरतो, ज्यातून महिलांनी केवळ कौटुंबिक भूमिकेपुरती मर्यादा न मानता, देशाच्या संरक्षणासाठीही मोठी जबाबदारी उचलली आहे हे स्पष्ट झाले आहे.

**'ऑपरेशन सिंदूर' – स्त्रियांची धाडसी पावले**

'ऑपरेशन सिंदूर' ही एक लष्करी मोहीम होती ज्यात महिलांनी संरक्षण दलात महत्त्वाची भूमिका पार पाडली. याअंतर्गत महिलांना सीमांवर पाठविण्यात आले, त्यांना युद्धजन्य परिस्थितीत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व जबाबदारी देण्यात आली. भारताच्या लष्कर, नौदल व वायुदलात महिलांचे प्रमाण वाढत आहे आणि त्यांनीही ही संधी सिद्धतेने पेलली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' ने दाखवून दिले की महिलांमध्ये केवळ सहनशक्तीच नाही, तर संकटांमध्येही योग्य निर्णय घेण्याची क्षमता असते.

**स्त्रियांमध्ये असलेले पटीन्स – संयम आणि निर्णयकता :–** स्त्रियांमध्ये नैसर्गिकपणे संयम, सहनशीलता, समजूतदारपणा आणि दुसऱ्याच्या भावनांचा आदर ठेवण्याची वृत्ती असते. हे गुण केवळ घरापुरतेच मर्यादित नसून, कोणत्याही युद्धजन्य स्थितीत उपयोगी ठरू शकतात. जेव्हा एखादी महिला गृहिणी म्हणून संपूर्ण कुटुंब व्यवस्थापन करते, तेव्हा ती आर्थिक, सामाजिक आणि भावनिक पातळीवर संतुलन राखते. हीच क्षमता युद्धभूमीत उपयोगी पडते. सीमेवर कार्यरत महिला अधिकाऱ्यांनी दाखवून दिले की संकटाच्या क्षणी शांत राहून निर्णय घेणे, सहकाऱ्यांमध्ये एकोपा राखणे आणि तणावाखालीही कामगिरी उंचावणे, हे सर्व त्या समर्थपणे करू शकतात. लष्करात 'पटीन्स' म्हणजे संयम आणि लवचिकता ही खूप महत्त्वाची असते, जी स्त्रियांमध्ये स्वाभाविकपणे असते.

**सीमांवर महिलांचं योगदान – नवा विश्वास :–** पूर्वी असे वाटायचे की युद्ध म्हणजे केवळ पुरुषांचं क्षेत्र. मात्र आजच्या काळात हे समीकरण बदलत आहे. भारतीय हवाई दलाच्या फायटर पायलट्सपासून ते बॉर्डर सिक्युरिटी फोर्सच्या गस्ती महिला जवानांपर्यंत अनेक उदाहरणे आहेत ज्या सिद्ध करतात की महिला युद्धासारख्या संकटांना सामोरे जाऊ शकतात. गेल्या काही वर्षांत महिला अधिकाऱ्यांनी सीमांवर कठीण वातावरणात काम करताना उत्कृष्ट नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि धाडस दाखवले आहे. हे फक्त त्यांच्या प्रशिक्षणाचे फळ नाही, तर त्यांच्या मानसिक ताकदीचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. पुरुषांनी स्वीकारावा स्त्रियांचा 'नेतृत्वाचा' हक्क स्त्री सबलीकरणाच्या वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा असा आहे की समाजाने, विशेषतः पुरुषांनी, महिलांचे नेतृत्व मान्य करणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळा महिलांना संधी दिली जात नाही कारण अजूनही पितृसत्ताक दृष्टिकोन बळकट आहे. मात्र बदलत्या युगात हे विचार मागे टाकणे गरजेचे आहे. जेव्हा पुरुष सहकाऱ्यांनी महिला अधिकाऱ्यांचे निर्णय मान्य केले, त्यांना नेतृत्वाची संधी दिली, तेव्हा संघटनांमध्ये एकोपा आणि परिणामकारकता वाढली. लष्करासारख्या कठीण क्षेत्रातही जेव्हा महिला कर्नल किंवा ब्रिगेडियरच्या पदावर पोहोचतात, तेव्हा त्यांचे सहकारी पुरुष जर त्यांचा सन्मानपूर्वक स्वीकार करतात, तेव्हा ती खरी स्त्री सबलीकरणाची जाणीव होते.

शिक्षण, आरोग्य आणि आत्मनिर्भरतेकडे वाटचाल महिलांना केवळ संरक्षण क्षेत्रात नव्हे, तर प्रत्येक क्षेत्रात संधी दिली पाहिजे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता या सर्व माध्यमातून त्यांचे सबलीकरण शक्य आहे. महिलांना फक्त सन्मानाची गरज नाही, तर स्वातंत्र्याची व जबाबदारीचीही गरज आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या अभियानांपासून ते 'महिला उद्यमिता विकास योजना' पर्यंत अनेक उपक्रम सरकारने सुरू केले आहेत. पण या योजनांना यशस्वी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. उपसंहार : स्त्री म्हणजे शक्ती, केवळ सहनशीलतेचे प्रतीक नाही. आजची स्त्री ही केवळ कुटुंबप्रमुख नाही, तर राष्ट्रनिर्मातीही आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हे केवळ एक लष्करी अभियान नव्हे, तर ते एक प्रतीक आहे – स्त्रीच्या आत्मविश्वासाचे, तिच्या क्षमतेचे आणि राष्ट्रासाठी तिच्या योगदानाचे. महिलांमध्ये असणारे 'पटीन्स' – संयम, सहिष्णुता, धैर्य, सहकार्य – ही युद्धासाठी आणि नेतृत्वासाठी आवश्यक वैशिष्ट्ये आहेत.

आज गरज आहे ती केवळ स्त्रियांना संधी देण्याची नाही, तर त्यांच्या क्षमतेचा पूर्ण आदर करण्याची. पुरुषांनीही त्यांना नेतृत्वाचे स्थान द्यावे, त्यांचा निर्णय मान्य करावा आणि स्त्री-पुरुष समतेचा खरा अर्थ कृतीतून दाखवावा. कारण जेव्हा स्त्री सक्षम होते, तेव्हा केवळ एक व्यक्ती नाही, तर संपूर्ण राष्ट्र मजबूत होते.



प्रा. मंगल काळे
प्राध्यापक, आयसीम कॉलेज

# पिंज-याच्या वाटचालीचा घातक ट्रेंड

सोशल मीडियावर सध्या चर्चेत असलेला 'स्टे-अॅट-होम गर्लफ्रेंड' (SAHG) किंवा 'स्टे-अॅट-होम वाइफ' हा ट्रेंड वरवर पाहता खूप आकर्षक आणि 'ग्लॅमरस' वाटत असला, तरी त्याचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम अत्यंत खोलवर जाणारे आहेत. विशेषतः स्त्रीमुक्तीच्या प्रदीर्घ लढ्यानंतर असा ट्रेंड येणे हे एका मोठ्या वैचारिक विरोधाभासाचे लक्षण आहे.

### श्रमाचे उदात्तीकरण की प्रतिगामी पाऊल ?

गेल्या काही शतकांपासून स्त्रियांनी घराबाहेर पडून स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी, मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी मोठा संघर्ष केला आहे. हा नवीन ट्रेंड या संघर्षाला एका क्षणात 'नकार' दिल्यासारखा वाटतो. जेव्हा एखादी विशी-पंचविशीतील मुलगी नोकरी सोडून "पतीच्या पैशावर जगणे" हाच आयुष्याचा उद्देश मानते, तेव्हा ती नकळतपणे स्वतःला पुन्हा एकदा आर्थिक परावलंबित्वाच्या साखळदंडात अडकवून घेते.

### कॉर्पोरेट ताण आणि 'बर्नआउट' (Burnout)

या ट्रेंडचा उदय होण्यामागे नोकरीच्या ठिकाणचा वाढता ताण हे एक महत्त्वाचे कारण आहे.

दुहेरी ओझे: आजही नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घराची जबाबदारी आणि ऑफिसचा ताण असे दुहेरी ओझे पेलावे लागते.

मानसिक थकवा : सततच्या स्पर्धेमुळे येणाऱ्या थकव्यावर 'पर्याय' म्हणून या ट्रेंडकडे पाहिले जात आहे.

परंतु, 'ताण' कमी करण्यासाठी 'स्वातंत्र्य' पणाला लावणे हा उपाय असू शकतो का? हा खरा प्रश्न आहे.

### 'सॉफ्ट लाइफ'चा भ्रम आणि सोशल मीडिया

सोशल मीडियावर दिसणारे हे व्हिडिओ अत्यंत 'सौंदर्यपूर्ण' असतात. सकाळी लवकर उठून कॉफी पिणे, घर सजवणे आणि स्किनकेअर करणे एवढेच आयुष्य मर्यादित असल्याचे यात भासवले जाते. मात्र, यात काही महत्त्वाच्या गोष्टी सोयीस्करपणे लपवल्या जातात: आर्थिक सुरक्षा: जर भविष्यात जोडीदाराशी पटले नाही किंवा काही अघटित घडले, तर स्वतःचे उत्पन्न नसलेल्या स्त्रीची अवस्था काय होईल? अस्तित्वाची लढाई: स्वतःचे करिअर नसताना येणारी पोकळी कालांतराने नैराश्याला कारणीभूत ठरू शकते.

### आर्थिक सक्षमीकरणावर आघात

आर्थिक स्वातंत्र्य हेच स्त्रियांच्या खऱ्या सक्षमीकरणाचे मूळ आहे. जेव्हा एखादी स्त्री स्वतः कमवते, तेव्हा तिला समाजात आणि कुटुंबात 'निर्णय घेण्याचा' अधिकार प्राप्त होतो. 'स्टे-अॅट-होम' संस्कृतीमुळे हा निर्णय घेण्याचा अधिकार पुन्हा एकदा पुरुषांच्या हातात जाण्याची भीती आहे. हा ट्रेंड स्त्रियांना पुन्हा 'दुय्यम' स्थानावर नेऊन ठेवतो.

### जागतिक महिला दिन आणि वास्तव

महिला दिनी यावर चर्चा होणे स्वाभाविक आहे, कारण हा दिवस स्त्रियांच्या कर्तृत्वाचा उत्सव साजरा करण्यासाठी असतो. अशा वेळी 'काहीही न करणे' किंवा 'दुसऱ्यावर अवलंबून राहणे' हे जर यशाचे लक्षण मानले जाऊ लागले, तर ते पुढील पिढीसाठी चुकीचा आदर्श ठरू शकते.

'निवड करण्याचे स्वातंत्र्य' (Choice Feminism) हे लोकशाहीत महत्त्वाचे आहेच. जर एखाद्या स्त्रीला मनापासून घरी राहायचे असेल, तर तो तिचा हक्क आहे. मात्र, जेव्हा याला एक 'ग्लोबल ट्रेंड' बनवून त्याचे उदात्तीकरण केले जाते, तेव्हा ते धोक्याचे ठरते. नोकरीच्या ठिकाणचा ताण कमी करण्यासाठी कामाच्या संस्कृतीत (Work Culture) बदल करण्याची गरज आहे, ना की स्त्रियांनी पुन्हा घराच्या चार भिंतीत बंदिस्त होण्याची.

# Creative Innovation: Fueling the Future of Progress



Dr Goutam G Saha
Director-Strategic Development,

**(Professor & Director - Strategic Development)**

Creative innovation has become the heartbeat of modern society. In an era defined by rapid technological advances, shifting consumer expectations, and global interconnectedness, the ability to think creatively and innovate consistently is no longer optional—it is essential for survival and success. Whether in business, education, science, or the arts, creative innovation drives meaningful change and opens the door to new possibilities.

**What Is Creative Innovation?**

Creative innovation is the process of generating fresh ideas and transforming them into practical, valuable outcomes. It is not merely about inventing something entirely new; it also involves improving existing concepts, finding clever solutions to persistent problems, and reimagining what already exists. It blends imagination with functionality, inspiration with execution.

**Why Creative Innovation Matters**

1. Solving Complex Challenges Many of today's issues—climate change, healthcare gaps, digital ethics, and economic inequality—require solutions that traditional thinking cannot provide. Creative innovation encourages unconventional approaches that push boundaries and reveal untapped opportunities.

2. Driving Economic Growth Industries that innovate thrive. Companies that embrace disruptive ideas gain competitive advantages, attract top talent, and build stronger relationships with consumers. Innovation fuels new markets, fosters entrepreneurship, and stimulates economic expansion.

3. Enhancing Quality of Life From smart technologies to advances in medicine and education, creative innovation improves the way people live, learn, communicate, and work. It enables breakthroughs that make daily life safer, healthier, and more fulfilling.

The Ingredients of Creative Innovation

Creative innovation is not accidental—it is cultivated. Several key elements help bring **innovative ideas to life:**

• Curiosity: Asking questions, exploring possibilities, and refusing to accept limitations.
• Collaboration: Bringing together diverse perspectives—engineers, designers, artists, scientists—to spark original solutions.
• Risk-Taking: Innovation thrives in environments where experimentation is encouraged and failure is viewed as a learning tool rather than a setback.
• Adaptability: Adjusting quickly to changes and refining ideas based on new information.
• Vision: Seeing beyond the present and imagining what the future could be.

**Fostering a Culture of Innovation**

Organizations and individuals can cultivate creative innovation through intentional strategies:

• Encourage free thinking and brainstorming. • Provide time and space for experimentation.
• Reward creativity—not just successful outcomes. • Embrace interdisciplinary collaboration.
• Offer continuous learning opportunities. When creativity becomes part of the culture, innovation becomes a natural outcome.

**Conclusion :** Creative innovation is the catalyst that propels society forward. It pushes boundaries, transforms industries, and inspires us to envision a better future. By nurturing creativity, embracing collaboration, and welcoming new ideas, we unlock the potential to solve challenges and shape the world in extraordinary ways. In a rapidly evolving landscape, those who innovate will lead—and those who support creative innovation will help build the next era of progress.



Mr Achyut Bhosle

### स्वातंत्र्यसैनिक विजेंद्र काबरा यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणाऱ्या 'आदर्श उद्योजक पुरस्कार'

## वारसा संघर्षाचा, सन्मान कर्तृत्वाचा

## विजेंद्र काबरा 'आदर्श उद्योजक' पुरस्काराचा गौरवशाली प्रवास

कोणत्याही संस्थेचे मोठेपण हे केवळ तिथल्या भव्य इमारतींवरून ठरत नाही, तर ती संस्था कोणत्या मूल्यांची जोपासना करते आणि समाजाला काय देते, यावरून ठरते. छत्रपती संभाजीनगर येथील आयसीम (ICEEM) कॉलेजने गेल्या काही वर्षांत केवळ इंजिनिअर्स घडवले नाहीत, तर 'मूल्याधिष्ठित शिक्षणाचा' एक नवा वस्तुपाठ घालून दिला आहे. या प्रवासातील सर्वात लखलखते पान म्हणजे स्वातंत्र्यसैनिक विजेंद्र काबरा यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा 'आदर्श उद्योजक पुरस्कार'. हा केवळ एक सोहळा नसून तो मराठवाड्याच्या मातीतील संघर्ष, जिद्द आणि शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या कर्तृत्वाचा गौरव आहे.

**स्वप्नपूर्तीचा प्रवास - सहजीवन वाडी ते जागतिक क्षितीज :-** स्वातंत्र्यसैनिक विजेंद्र काबरा यांनी आयुष्यभर व्यावसायिक शिक्षणाचा आणि स्वावलंबनाचा आग्रह धरला. त्यांनी ज्या 'सहजीवन वाडी'च्या माध्यमातून तंत्रशिक्षणाचे स्वप्न पाहिले होते, त्याच भूमीवर आज आयसीम कॉलेजच्या माध्यमातून हजारो तरुण आपले भविष्य घडवत आहेत. कॉलेजचे चेअरमन डॉ. सुभाष झवर सर, दिलीप सारडा, डॉ. सचिन झवर आणि डॉ. कल्पना झवर यांच्या दूरदृष्टीने सुरू झालेला हा पुरस्कार म्हणजे काबरा यांच्या विचारांना दिलेली एक जिवंत 'पावती' आहे.

**गुणवत्तेची खरी कसोटी-निवडीचे निकष :-** हा पुरस्कार कोण्या बड्या उद्योजकाला केवळ नावासाठी दिला जात नाही, तर त्यामागे अत्यंत कठोर आणि पारदर्शक निकष आहेत. तरुण नेतृत्व, नवीन पिढीतील ध्येयवेड्या तरुणांना प्रोत्साहन देणे. स्थानिक रोजगार, मराठवाड्यातील हातांना काम देण्याची जिद्द ज्यांच्याकडे आहे, अशांचा सन्मान. सामाजिक भान, केवळ नफा कमावणे हा उद्देश नसून समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व. शून्यातून विश्व, ज्यांनी कोणत्याही वारशाशिवाय स्वतःच्या कष्टावर साम्राज्य उभे केले, अशांचा शोध घेणे.

**प्रेरणेचे दीपस्तंभ, गेल्या वर्षांतील मानकरी :-** या पुरस्काराचे गांभीर्य गेल्या काही वर्षांतील विजेत्यांच्या नावावरून स्पष्ट होते. २०२२ मध्ये सिद्धांत तवरावाला यांनी पी.पी.ई. किट निर्मितीतून आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले. २०२३ चे मानकरी तुकाराम तांगडे यांनी गरिबीवर मात करत मेडिकल क्षेत्रातील साधनांची निर्मिती करून तंत्रज्ञानाचा सामाजिक वापर कसा करावा, याचा आदर्श घालून दिला. २०२४ मध्ये संजय वायाळ यांनी आयटी आणि कृषी (टिशू कल्चर) यांची सांगड घालून उत्पादने निर्यात करण्यापर्यंत झेप घेतली, जी मराठवाड्याच्या शेतकऱ्यांसाठी मोठी प्रेरणा आहे. तर २०२५ चे मानकरी सोपान राठोड यांचा प्रवास थक्क करणारा आहे. एका ऊसतोड कामगाराचा मुलगा जेव्हा सॉफ्टवेअर क्षेत्रात क्रांती करतो आणि शेकडो लोकांना रोजगार देतो, तेव्हा तो खऱ्या अर्थाने 'युथ आयकॉन' ठरतो.

**विद्यार्थ्यांसाठी चालते-बोलते विद्यापीठ :-** हा सोहळा आयसीमच्या विद्यार्थ्यांसाठी केवळ एक कार्यक्रम नसून ते एक 'चालते-बोलते विद्यापीठ' आहे. जेव्हा हे यशस्वी उद्योजक आपला संघर्ष मांडतात, तेव्हा विद्यार्थ्यांमध्ये केवळ नोकरी मिळवण्याची नाही, तर 'नोकरी देणारे' (Job Creators) बनण्याची ऊर्मी निर्माण होते. पुस्तकी ज्ञानाला जेव्हा अशा जिवंत अनुभवांची जोड मिळते, तेव्हाच खऱ्या अर्थाने उद्योजकतेचे संस्कार घडतात.

'विजेंद्र काबरा आदर्श उद्योजक पुरस्कार' हा आता आयसीम कॉलेजच्या इतिहासातील एक सुवर्णपान बनला आहे. मराठवाड्याच्या ग्रामीण भागात दडलेली प्रतिभा शोधणे आणि तिला सन्मानाने जगासमोर आणणे, हे पवित्र कार्य या माध्यमातून घडत आहे. हा वारसा असाच पुढे चालत राहो आणि इथूनच उद्याचे जागतिक दर्जाचे उद्योजक घडावेत, हीच या पुरस्काराची खरी फलश्रुती ठरेल.

# माझा ICEEM चा प्रवास
# जिथे मुळे रुजली आणि पंख विस्तारले!



प्रा .सविता गायके
प्राध्यापक, आयसीम कॉलेज

मी, प्रा .सविता गायके आज तुमच्यासमोर एक माजी विद्यार्थी आणि सध्या ICEEM परिवाराचा एक सदस्य (प्राध्यापक) म्हणून उभी आहे. माझ्यासाठी हा केवळ एक प्रवास नाही, तर एका वर्तुळाच्या पूर्णत्वाची भावना आहे. ज्या संस्थेच्या बाकावर बसून मी उद्याची स्वप्ने रंगवली, आज त्याच संस्थेच्या व्यासपीठावरून भावी पिढीला घडवण्याची संधी मिळणे, यापेक्षा मोठे भाग्य कोणते असू शकते!

एक विद्यार्थी म्हणून आजही मला तो दिवस स्पष्ट आठवतो, जेव्हा मी एक महत्त्वाकांक्षी तरुण म्हणून ICEEM च्या कॅम्पसमध्ये पहिले पाऊल ठेवले होते. डोळ्यात मोठी स्वप्ने आणि मनात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द होती. ICEEM ने मला केवळ पुस्तकी ज्ञान किंवा व्यवस्थापनाचे धडे दिले नाहीत, तर माझ्या विचारांना दिशा दिली आणि माझ्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले.

गुरुंची मायेची सावली - येथील प्रत्येक शिक्षकाने केवळ विषय शिकवला नाही, तर आयुष्य कसे जगावे याचे मार्गदर्शन केले. त्यांच्या ज्ञानाने, अनुभवाने आणि प्रोत्साहनाने माझ्या मनात आत्मविश्वासाची ज्योत पेटवली. मैत्रीचे अतूट नाते सहाध्यायी मित्रांसोबत घालवलेला प्रत्येक क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. आम्ही एकत्र अभ्यास केला, आणि एकमेकांच्या सुखदु:खात भागीदार झालो. ICEEM ने मला आयुष्यभरासाठीचे मित्र दिले.

सिद्धांतापलीकडचे शिक्षण केस स्टडीज, इंडस्ट्रियल व्हिजिट्स आणि लाईव्ह प्रोजेक्ट्समधून मिळालेले व्यावहारिक ज्ञान माझ्या करिअरचा भक्कम पाया ठरले. थोडक्यात सांगायचे तर, एक विद्यार्थी म्हणून ICEEM ने माझ्या स्वप्नांना आकार दिला आणि त्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी लागणारी ऊर्जा दिली.

एक प्राध्यापक म्हणून आज जेव्हा मी वर्गात विद्यार्थ्यांसमोर उभी राहते, तेव्हा मला त्यांच्या डोळ्यांत स्वत:चे प्रतिबिंब दिसते. तीच जिद्द, तीच स्वप्ने आणि तोच उत्साह! एक प्राध्यापक म्हणून माझी भूमिका केवळ ज्ञान देण्यापुरती मर्यादित नाही, तर ती त्याहून खूप मोठी आहे. मार्गदर्शकाची जबाबदारी ज्याप्रमाणे माझ्या गुरूंनी मला योग्य मार्ग दाखवला, त्याचप्रमाणे या तरुण मनांना योग्य दिशा दाखवणे हे मी माझे कर्तव्य मानते त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे, यात मला आनंद मिळतो.

शिकण्या-शिकवण्याची प्रक्रिया प्राध्यापक म्हणून मी जेवढे शिकवते त्यापेक्षा जास्त या तरुण पिढीकडून शिकत असतो. त्यांचे नवीन विचार, त्यांची ऊर्जा आणि त्यांची नाविन्याची ओढ मला सतत अपडेट राहण्यासाठी प्रेरित करते. माझ्या प्रिय विद्यार्थी मित्रांनो, तुम्ही खूप भाग्यवान आहात की तुम्हाला ICEEM सारख्या संस्थेत शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे. •या संधीचे सोने करा. प्रत्येक क्षणाचा पुरेपूर वापर करा. •प्रश्न विचारा, चुका करा आणि त्यातून शिका. कारण वर्गखोलीच्या बाहेरचे जग तुम्हाला चुकांमधून शिकण्याची संधी वारंवार देणार नाही. •तुमच्या शिक्षकांचा अनुभव हा तुमच्यासाठी सर्वात मोठा खजिना आहे. तो आत्मसात करण्याचा प्रयत्न करा.ICEEM हे केवळ एक महाविद्यालय नाही, ते एक कुटुंब आहे. एक विद्यार्थी म्हणून या संस्थेने मला पाया दिला आणि एक प्राध्यापक म्हणून याच संस्थेने मला त्या पायावर उभे राहून आकाशात भरारी घेण्याचे बळ दिले.



प्रा. सुजाता चेचरे
CSE, आयसीम कॉलेज

# The Silent Revolution: CSE आणि अदृश्य जग

एकेकाळी संगणक फक्त आकड्यांमध्ये बोलत होते, शून्य आणि एक यांच्या मर्यादित अडकलेले.पण आज ते शिकत आहेत भावना, समजत आहेत मानवतेचा स्पर्श. कृत्रिम बुद्धिमत्ता आता फक्त विचार करत नाही,ती हसणं, राग, आनंद असं सगळं ओळखते.कोडच्या ओळींमधून आता उमटतोय मनाचा स्वर.

या प्रवासाचं नाव आहे "अल्गोरिदमपासून भावना पर्यंत". ही केवळ मशीनची नव्हे, तर माणसाच्या कल्पकतेची कहाणी आहे.

कारण शेवटी तंत्रज्ञानाचं ध्येय मानवाला बदलणं नव्हे, तर त्याला अधिक समजून घेणं आहे.

कधी पाहिलं आहे का? आपल्या रोजच्या technology मागे चालते एक silent revolution.

Phones, apps, AI आणि cloud computing आपलं जीवन बदलत आहेत subtle पण powerful.

CSE म्हणजे फक्त कोड लिहिणे नाही;ते आहे algorithms आणि data च्या जादूने अदृश्य जगाला shape देण्याचं काम. AI आपला mood ओळखतो, machine learning आपली preference समजतो, आणि cloud computing knowledge instantly जगभर share करते.

हीच आहे silent revolution मोठा आवाज न करता, आपल्या जीवनाला smarter, faster आणि connected बनवणारी. आणि आपण, CSE students, या क्रांतीचे architects आहोत.

फक्त technology वापरणारे नव्हे, तर ती create करणारे.

Because in the invisible world, every line of code writes the future.

# मातीपासून मायक्रो प्रोसेसरपर्यंत

गावाकडचं जीवन साधं पण संघर्षमय असतं. कुटुंब शेतात राबत असताना, त्या घरातील एका मुलाने मोठं स्वप्न पाहिलं अभियंता बनायचं!

मर्यादित साधनं, वीज नसताना कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास, आणि जुन्या मोबाईलवर ऑनलाइन वर्ग — पण त्याची जिद्द अबाधित राहिली.

महाविद्यालयात आल्यावर भाषेचा आणि वातावरणाचा अडथळा जाणवला, तरी त्याने चिकाटीने प्रत्येक आव्हान स्वीकारलं. प्रोजेक्ट, प्रॅक्टिकल्स, आणि स्पर्धांमधून त्याने स्वतःला सिद्ध केलं.

शेवटी जेव्हा त्याच्या हातात अभियांत्रिकी पदवी आली, तेव्हा त्याचे आई-वडील आणि गाव अभिमानाने उजळून निघाले.

आज तो इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरला आहे.

"जिद्द आणि मेहनत असेल, तर गावाचं अंतर कधीच अडथळा ठरत नाही."

प्रा. शेख सुफीया अहमद



गणेश के. बरडे

# अभिमान आयसीमचा, आनंद यशाचा

मी गणेश के. बरडे, M.B.A (ICEEM) या प्रतिष्ठित महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला अपार अभिमान आहे. या महाविद्यालयाने मला केवळ दर्जेदार शैक्षणिक ज्ञानच दिले नाही, तर माझ्या व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा दिली, आत्मविश्वास प्रज्वलित केला आणि जीवनातील मूल्यांची सखोल जाण करून दिली.

येथील प्रत्येक दिवस आजही मनात ताजाच आहे. शिक्षकांचे निःस्वार्थ मार्गदर्शन, सहाध्यायी मित्रमैत्रिणींचा सहवास आणि महाविद्यालयातील प्रेरणादायी वातावरणाने मला जीवनातील प्रत्येक टप्प्यावर यशस्वी होण्यासाठी सक्षम बनवले. प्रत्येक क्षण काहीतरी नवीन शिकवण देणारा ठरला ज्यामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वाची भक्कम जडणघडण झाली. महाविद्यालयाने दिलेल्या मजबूत शैक्षणिक आणि चारित्र्यिक पायावरच माझ्या करिअरची पायाभरणी झाली. आज मी व्यावसायिक क्षेत्रात जे काही यश मिळवले आहे, त्यामागे या संस्थेचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

आजच्या विद्यार्थ्यांना माझा एकच संदेश आहे

*संधी प्रत्येकाकडे येते, फक्त ती ओळखण्याची आणि तिचा योग्य वापर करण्याची तयारी असावी.* शिक्षकांचे मार्गदर्शन, महाविद्यालयातील शिस्त आणि स्वतःची सातत्यपूर्ण मेहनत या तिन्हींचा संगम केल्यास यश अटळ आहे.* आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवा आणि प्रत्येक दिवस काहीतरी नवीन शिकण्याची संधी म्हणून स्वीकारा.

ICEEM माझ्यासाठी केवळ एक शैक्षणिक संस्था नाही, तर ती माझ्या आयुष्यातील प्रेरणास्त्रोत आहे .

I – Igniting Confidence (आत्मविश्वास प्रज्वलित करणे)

C – Creating Opportunities (संधी निर्माण करणे)

E – Encouraging Excellence (उत्कृष्टतेस प्रोत्साहन देणे)

E – Empowering Students (विद्यार्थ्यांना सक्षम बनवणे)

M – Motivating for Success (यशासाठी प्रेरित करणे)

ICEEM म्हणजे आत्मविश्वास वाढविण्याचे माध्यम, स्वप्नांना गती देणारे व्यासपीठ आणि यशाकडे झेप घेण्यासाठी प्रेरणा देणारी दिशा आहे. हे महाविद्यालय विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, जबाबदारीची जाणीव आणि समाजासाठी काहीतरी करण्याची भावना रुजवत राहते.या संस्थेचा एक भाग असल्याचा मला सदैव अभिमान आहे. पुढील काळात या संस्थेच्या प्रगतीत माझ्या परीने योगदान देण्याची मला मनापासून इच्छा आहे. भविष्यात हे महाविद्यालय अधिकाधिक उंच भरारी घेईल, याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे.



Prof. Nilesh V. Kalyankar

# Motivation is crucial for college students

Motivation is crucial for college students to achieve their academic goals and excel in their studies. It serves as a driving force that enables students to overcome challenges, stay focused, and maintain a positive mindset throughout their college journey.

In this article, we will explore effective strategies and techniques to enhance college student motivation, leading to improved academic performance and overall success.

Motivation plays a vital role in determining the success of college students. It is the inner desire and enthusiasm that pushes students to take action and achieve specific goals. When students are motivated, they are more likely to actively participate in class, complete assignments on time, and seek additional learning opportunities.

Motivated students show higher levels of engagement, dedication, and perseverance in their studies.

## Understanding Motivation

Motivation can be described as the inner desire and enthusiasm that drives individuals to take action and achieve specific goals. For college students, motivation is crucial in determining their level of engagement, dedication, and perseverance in their studies.. When students are motivated, they are more likely to actively participate in class, complete assignments on time, and seek additional learning opportunities.

To enhance college student motivation, it is important to understand the factors that can influence it. By understanding these factors, both educators and students can create an environment that fosters motivation. Some key factors that can affect college student motivation include:

### 1. Clear Goals and Expectations

Providing college students with clear goals and expectations allows them to understand what is expected of them. When students have a sense of direction, they are more likely to be motivated and driven to succeed. Clearly defined objectives can serve as a roadmap, enabling students to set their own goals and track their progress.

To ensure that students understand the goals and expectations, educators can communicate them clearly and consistently. This can be done through syllabi, course outlines, and regular discussions. By setting clear goals, educators can help students stay motivated and focused on their studies.

### 2. Supportive Learning Environment

Creating a supportive learning environment is essential for promoting student motivation. When students feel valued, supported, and respected, their motivation to learn and excel increases significantly. Educators can foster a supportive O learning environment by:

- Fostering positive relationships between students and educators: Building positive relationships can create a sense of belonging and support for students. This can be achieved through open communication, active listening, and empathy.

- Encouraging open communication: Creating an environment where students feel comfortable sharing their thoughts, opinions, and concerns can enhance motivation. Educators can encourage open communication by providing opportunities for discussions, feedback, and questions.
- Providing necessary resources and support:

Ensuring that students have access to the resources and support they need can enhance motivation. This can include academic resources, study materials, tutoring services, and counselling support.

By creating a supportive learning environment, educators can help students feel motivated and empowered to excel in their studies.

3. Rewards and Recognition

Acknowledging and rewarding students' achievements can enhance their motivation levels.

Recognizing their efforts, whether through praise, certificates, or other forms of acknowledgment, can boost their self-esteem and drive them to continue putting in their best effort. Additionally, offering rewards for reaching specific milestones or goals can provide an extra incentive for students to stay motivated.

Educators can implement various strategies to reward and recognize students' achievements. This can include public recognition in class, certificates of achievement, or even small rewards such as extra credit or privileges. By providing rewards and recognition, educators can motivate students to work towards their goals and maintain a positive attitude towards their studies.

4. Personal Interests and Relevance

Making the learning material relevant to students' interests and future aspirations can increase their motivation. When students can see the value and applicability of what they are learning, they are more likely to stay engaged and motivated.

Educators can incorporate real-life examples, case studies, and practical applications to make the content more relatable and meaningful to student

By connecting the learning material to students' interests and goals, educators can enhance motivation and engagement. This can be done through discussions, projects, and assignments that allow students to explore topics that interest them. By making the content relevant, educators can help students see the importance of their studies and stay motivated to learn.

5. Self-efficacy and Confidence Building

Building students' self-efficacy and confidence is vital for fostering motivation. When students believe in their abilities to succeed and overcome

challenges, they are more likely to take risks, set higher goals, and persist in the face of obstacles.

Encouraging students to celebrate small victories, providing constructive feedback, and offering support in developing necessary skills can enhance their self-efficacy and motivation.

Educators can help build students' self-efficacy by providing opportunities for success and growth.

This can include assigning tasks that are challenging but achievable, providing constructive feedback that focuses on strengths and areas for improvement, and offering support and guidance when needed.

By building students' self-efficacy, educators can enhance their motivation and

confidence in their ability to succeed.

6. Time Management and Goal Setting

Efficient time management and goal-setting skills are essential for college student success. Helping students develop these skills can improve their motivation, as they will have a clear plan and structure for their studies. Educators can guide students in setting realistic goals, breaking them down into manageable tasks, and creating a study schedule that allows for effective time utilization.

By teaching students effective time management and goal-setting strategies, educators can help them stay motivated and focused on their studies.

This can include teaching techniques such as prioritizing tasks, creating to-do lists, and using time management tools. By developing these skills, students can better manage their time, stay organized, and maintain motivation throughout their college journey.

Strategies for Enhancing College Student Motivation

1. Break Tasks into Smaller Achievable Steps

Large tasks can often be overwhelming and demotivating for students. Breaking them down into smaller, more achievable steps allows students to experience a sense of progress and accomplishment, boosting their motivation to continue working towards their goals.

When assigning tasks or projects, educators can guide students in breaking them down into smaller, manageable steps. This can be done by providing clear instructions, outlining the different components of the task, and setting deadlines for each step. By breaking tasks into smaller steps, students can focus on making progress and staying motivated throughout the process.

2. Foster a Growth Mindset

Encouraging a growth mindset among college students can significantly impact their motivation levels. Emphasize the idea that intelligence and abilities can be developed through dedication and effort, rather than being fixed traits. This mindset shift can inspire students to embrace challenges, persevere through setbacks, and believe in their capacity to learn and improve.

To foster a growth mindset, educators can provide opportunities for students to reflect on their progress, learn from their mistakes, and set realistic expectations. By promoting a culture of continuous learning and improvement, educators can enhance students' motivation and resilience in their academic pursuits.

3. Provide Constructive Feedback

Regularly providing students with constructive feedback helps them understand their strengths and areas for improvement. Constructive feedback should focus on specific actions and behaviours rather than personal characteristics. This feedback loop enables students to make necessary adjustments, learn from their mistakes, and stay motivated in their pursuit of academic success.

When providing feedback, educators can focus on highlighting students' strengths and areas for improvement. This can be done through written comments, one-on-one discussions, or peer feedback. By providing constructive feedback, educators can guide students toward improvement and help them stay motivated in their studies.

**4. Engage Students through Active Learning**

Passive learning can often lead to disengagement and reduced motivation. Incorporating active learning strategies, such as group discussions, problem-solving activities, and hands-on projects, can enhance student engagement and motivation.

By actively participating in the learning process, students develop a deeper understanding and connection with the subject matter.

Educators can incorporate active learning strategies by including interactive activities, group projects, and case studies in their teaching methods. By engaging students in hands-on learning experiences, educators can stimulate their curiosity, promote critical thinking, and enhance their motivation to learn.

**5. Encourage Collaboration and Peer Learning**

Collaborative learning environments and peer interactions can have a positive impact on student motivation. Encourage students to work together, share knowledge, and support each other's learning journey. Collaborative activities foster a sense of community, promote healthy competition, and provide opportunities for students to learn from their peers.

Educators can create opportunities for collaboration and peer learning by assigning group projects, facilitating discussions, and encouraging peer feedback. By fostering a collaborative learning environment, educators can enhance student motivation, teamwork skills, and overall academic performance.

## Conclusion

